# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक २८-१०-१९९१**

**रजिष्टर क्र. ०६**

मा. महापौर :- आता यावर जास्त चर्चा करु नये. संबंधीत बाबतीत वेतन श्रेणी रु. 2200/ ते 3500/- अशी ठेवण्यात बाबत दुरुस्ती करण्याचे सुचविले आहे. ते कायम करण्यात यावे.

श्री. रतन कुमार पंडागळे :- मा. महापौर साहेब सदरचा प्रस्ताव जसा आहे तसाच करुन आपण शासनाकडे पाठवावा असे करण्यात यावे. आपण वेतन श्रेणीमध्ये दुरुस्ती का सुचविता?

महापौर :- सर्वानुमते असे ठरलेले आहे की, संबंधित प्रस्ताव गेल्या 3-4 महीण्यापासून सतत घेत आहे. आणि सोलापूर, कोल्हापूर, पुणे मनपा कडील माहिती मागविण्यापेक्षा पुन्हा कालावधी जास्ती लागेल व प्रस्ताव पडून राहील. करीता उप आयुक्तांच्या घरी या बाबत चर्चा झालेली असल्याने रु 2200/- ते 3500/- अशी् वेतन श्रेणी ठेवून मान्यता देण्यात यावी. असे होत आहे.

तकी हसन खान :- पोस्ट क्रियेट करुन सोडून घ्यावा व पे स्केल नंरत पाहता येईल. आणि सदरील प्रस्ताव प्रशासना तर्फे आलेला आहे का?

महापौर :- प्रशासना तर्फे सदरील प्रस्ताव आलेला आहे. परंतू प्रशासनाने मांडलेल्या प्रस्ताव सभागृहाला काही बंधने असतात. किंवा नाही मनपाच्या आर्थिक बोजा बाबत. सुद्धा सभागृहात विचार करावा लागतो.

अजिज जहागिरदार :- प्रशासनाने मांडलेल्या या ठरावाशी् विसंगती दिसून येते. करिता आपण असे सुचित करावे की,सदरील वेतन श्रेणी रु 2200/- ते 3500/- अशी प्रस्तावात दुरुस्ती करण्यात येते असे घोषीत करावे.

मा. आयुक्त :- मा. आयुक्तांना विनंती आहे. की, त्यांनी त्यांच्या अधिकारानुसार कार्यवाही करावी.

रशिद मामू :- सदरील प्रस्ताव मंजूर करावे परंतू असे काही प्रस्ताव आहेत की, संबंधित कर्मचारी/ अधिकारी कामे करतात परंतू त्यांचे पदाचे बाबतीत कुणीही कार्यवाही करीत नाही. व प्रशासन डोळेझाक करते असे होता कामा नये. सर्वांना सारखेच घेवून चालावे असा न्याय व्हावा.

प्रदिप जैस्वाल :- स. सदस्य श्री. रशिद मामु यांनी सुचविल्या प्रमाणे माझे अनुमोदन आहे. माझे असे व्यक्तिगत मत आहे की, असे काही प्रशासनाकडे प्रस्ताव आहेत की ते पडून आहेत. तेव्हा अशा प्रकारचे सर्व प्रस्ताव एकत्रितरित्या पुढील सभेसमोर ठेवण्यात यावे व त्यास मंजूरी देण्यात यावी. या प्रमाणे कोणत्याही प्रकारची जातीवाद करण्यात येऊ नये.

मोहसिन अहेमद :- स.सदस्य श्री. रशिद मामूंचे बोलणे आपल्याला समजले नसेल . जातीय वादावर बोलेले नाही. त्यांनी बोलल्या प्रमाणे माझा पांठीबा आहे.

अजिजुल्ला बेग :- या संदर्भात प्रशासनाने परटीकुलर असणे आवश्यक आहे.

आयुक्त :- आपके माहितीके लिये बताता हूँ ये जो स्केल है. ऑल इंडिया सर्व्हिस मे इंडियन पोलीस ऑफीसर सुपरिटडींग ऑफ पुलीस के रॅक की सिलेक्श्न ग्रेड मे पोस्ट है. रु 3000/- ते 4500/-

श्री. तकीहसन खॉन :- आर्थिक बोजा प्रति महीना किती पडणार एका पदासाठी.

मा. महापौर :- मनपाचे आर्थिक बोजा पहावयाचे आहे, महिना 400/-रु वाढवून होत आहे. तेव्हा प्रति वर्ष होत आहे तर रु 3200/- ते 4500/- च्या स्केल मुळे वार्षिक बोजा रु 40,000/- होते.

श्री. तकी हसन खॉन :- या मध्ये पशुधन विकास अधिकारी तथा उद्यान अधिक्षक यांना पुढे कोणतीही बढती नाही. त्यांनाही वेतन श्रेणी देण्यात यावी.

मा. महापौर :- प्रकल्प अधिकाराचे जे सध्याचे पद आहे ते वर्ग -2 चे असून आता वर्ग 1 साठी आपण करुन त्या बाबत मुख्य लेखा परिक्षक यांनी खुलासा करावा.

मुख्य लेखा परिक्षक :- आपल्याकडे वर्ग वर्ग-2 चे जी वेतनश्रेणी आहे ती 2000 ते 3500 अशी आहे. आणि वर्ग 1 साठी 2200 ते 3700 काही डिपार्टमेंट मध्ये आहे. तर डेप्युटी कलेक्टर यांना रु. 2200 ते 4000 आहे. रेव्हन्यु डिपार्टमेंट मध्ये वर्ग-1 साठी रु. 2200 ते 3700 अशी आहे.

मा. आयुक्त :- आपण जे पुणे येथील जे स्केलचे सुचित केलेले आहे. आयुक्तांचे पे स्केल रु 3200/- आहे. दुसरे पद आयुक्तांचे करणार आहे काय?

मा. महापौर :- तर आपण रु 2200/- ते 4000/- करु शकतो ना.

श्री. असफलखाँनः- रु 2200/- ते 4000/- यामध्ये माझे थोडा अमेंटमेंट आहे. हे जे पेस्केल आपण सुचित केले. जरुर करा परंतु पशुधन विकास अधिकारी आणि उद्यान अधिक्षक यांना कोणतीही बढती पुढे नाही हे सत्य. बरोबर जे झोन अधिकारी आपल्याकडे आहेत त्या सर्वांना वर्ग-1 पदावर बढती आता मिळू शकत नाही. व केवळ आयुक्तांचे पद सध्या भरावयाचे आहे. ते केवळ सर्व झोन अधिकाऱ्यातून एकाला जेष्ठता सुची नुसार मिळेल म्हणजे मला अस सुचवायचे आहे की, जे अधिकारी किंवा वरिष्ठ लिपीक निवृत्तीसाठी 5 वर्षात आहे. त्या निवृत्त पर्यंत वर्ग -1 चा पेस्केल देण्यासाठी अमेंडमेंट केले पाहिजे.

(स. सदस्य , श्री अयफखॉन यांनी दुरुस्त प्रस्ताव विषय क्र -6 तील दुरुस्ती म्हणून सभागृहात ऐन वेळी मांडला)

मा. महापौर :- संबंधित प्रस्ताव आहेत गेल्या 4-5 मिटींग पासून येत असल्याने मंजूर करणे आवश्यक आहे.

श्री. तकीहसन खॉन :- सदरील प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

मा. महापौर :- यापुर्वी सुचित केल्या प्रमाणे डेप्युटी कलेक्टरचे रेव्हेन्यु डिपार्टमेंटचे जे वर्ग-1 ची वेतन श्रेणी रु.2200/- ते 4000/- हे वर्ग -1 साठी ठेवण्या बाबत दुरुस्ती करुन सभागृहाने मान्यता देण्यास काही हरकत नसून आता चर्चा करण्यात येऊ नये.

श्री. बंडू प्रधान :- मा. आयुक्ताचे जे स्विय सहाय्यक आहेत त्यांची वेतन श्रेणी.

मा. महापौर :- सर्व स.सदस्य तथा मा. आयुक्तांना विनंती की मी सुचित केल्या प्रमाणे वर्ग 1ची वेतन श्रेणी रु 2200/- ते 4000/- देण्या बाबत प्रस्ताव दुरुस्ती करण्यात येत आहे. या बाबत कुणास काही मत नोंदवावयाचे असल्यास त्यांनी सांगावे नसता प्रस्ताव दुरुस्तीने मंजूर करण्यात आला असे समजायचे रु 2200/- ते 4000/- सुधारित पे स्केलची वेतन श्रेणीच्या प्रकल्प संचालकाच्या पदास दुरुस्तीसह मंजूरी देण्यात येते. कुणास विरोध दर्शवावयाचे असल्यास त्यांनी करावे. आता चर्चा करण्यात येऊ नये.

श्री. रतन कुमार पंडागळे :- प्रस्ताव क्र. 7 जशास तसा मंजूर करुन शासनाकडे पाठविण्यात यावा.

श्री. महादेव सुर्यवंशी :- विषय क्र. 6 व 7 प्रमाणे मागे उप आयुक्त यांचे पदाचे संदर्भात प्रस्ताव प्रशासना मार्फत माडण्यात आलेला होता मग तो प्रस्ताव पुन्हा का सभे समोर मांडण्यात आलेला नाही. जसे विद्युत उप अभियंताचे पदास सहामहिण्याचा कालावधी वाढवून दिला जातो. त्याच प्रमाणे

प्रशासनाने उप आयुक्तांचे पदा बाबत सुद्धा सहा महिण्याच्या कालावधीसाठी मंजूरी देवून पद भरण्यात यावे.

श्री. अलफ खॉंन हुसैनखॉंन :- मी सुचविले ते उप आयुक्तांच्या पदासाठी नसुन जो अमेंडमेंट प्रस्ताव मांडलेला आहे. तो मनपातील जे झोन अधिकारी आहेत किंवा वरिष्ठ लिपीक आहेत. त्यांना निवृत्तीसाठी केवळ पाच वर्षाचा कालावधी शिल्लक आहे. अशा सर्वांना त्यांच्या पदाच्या पुढील वेतन श्रेणी देण्या बाबत मी सांगितलेले आहे. तशी प्रस्तावात दुरुस्ती व्हावी.

मा. आयुक्त :- उप आयुक्ताचे ठराव ॲडमिनिस्ट्रेटर असतांना पाठविला होता. मंजूर करुन आणि ते शासनाकडे पेंटींग आहे आणि म्हणून ते परत सादर करण्याचे गरज नाही. जर गरज भासली तर सदरील पदाचे बाबतीत विचार करता येईल ते मला ॲडमिनिस्ट्रेटीव्हली डिसाईन करु द्यायच ना.

श्री शंकर मगर, श्री. केशव सोनवणे , :- मग याच पदाच्या बाबतीत जास्त गरज भासली काय ? तेव्हा या पदाच्या बरोबर उप आयुक्ताचे पदाचे बाबतीतही खर्च होणार नाही काय ?

मा. आयुक्त :- ॲडमिनिस्ट्रेटिव्हली अगर जरुरत पडेगी पुरा इसका अभ्यास करके व्हेटर ॲक्च्युअली टॅंक आऊट हे सभी इसको भर सकते है. पोस्ट अगर गव्हर्नमेंटका ऑर्डर सिक्स मंथ का है।

डॉ. चेनकरण संचेती :- आताच संबधिंत पदांची गरज भासली काय या सभेमध्ये उहापोह करण्यापेक्षा आपण आर/आर तयार करुन प्रशासनाने प्रस्ताव मांडावा त्यानंतर कार्यवाही करावी. या ठिकाणी उगीचच वेळ वाया जातो.

मा. आयुक्त :- ज्यांचे गरज नाही असे म्हणत नाही गरज भासण्यासाठी त्याची निवेदन करुन व्हॉट ईज दि वर्क लोड करुन मग भरायचे कारण सहा महिनेसाठी जेव्हा टेंपररी पोस्ट भरती त्यांची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर येते.

श्री.म. इस्माईल :- स.सदस्य श्री. आलफखॉन यांनी जो प्रस्ताव दुरुस्तीसाठी मांडलेला आहे. त्यावर अगोदर चर्चा करुन मंजूरी देण्यात यावी.

मा. महापौर :- संबंधित प्रस्ताव अगोर सभागृहासमोर वाचून दाखविण्यात यावा.

श्री. महादेव सुर्यवंशी :- आर /आर ज्यावेळी तयार करणत येतील त्यांवेळी कार्यवाही व्हावी.

श्री. अलफखॉन हुसेनखॉन :- माझे एकच म्हणणे आहे की, कर्मचाऱ्यांच्या प्रोमोशन नाही आणि निवृतीसाठी वर्षाचा काळ बाकी आहे. अशा कर्मचाऱ्यांना पदोन्नती नंतर जी वेतन श्रेणी देण्यात येते व वेतन श्रेणी कर्मचाऱ्यांना देण्यात यावी. अशा प्रकारचे प्रस्तावात दुरुस्ती करण्यात यावी त्यासाठी प्रस्ताव मांडला आहे.

सचिव :- विषय क्र.6: (स. सदस्य श्री. अलफखॉन यांनी दि.19/10/91 रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेसाठी ठेवलेला दुरुस्ती प्रस्ताव)

औरंगाबाद महानगरपालीका मधिल कर्मचारी ज्यांचे सेवा निवृत्तीसाठी 5 वर्षाचा काळ बाकी राहीलेला आहे. अशा कर्मचाऱ्यांना पदोन्नती नंतर जी वेतन श्रेणी देण्यात येते . ही वेतन श्रेणी या कर्मचाऱ्यांना देण्यात यावे.

सुचक : श्री. अलफखॉन हूसेनखॉन

अनुमोदक : श्री. मिर्झा अलिम बेग पि. कलीम बेग.

श्री. विठ्ठल पेरकर.

**संवाद**

श्री. प्रदिप जैस्वाल :- या प्रस्ताव मध्ये स्पष्ट उल्लेख करायला पाहिजे उद्यान अधिक्षक विधी सल्लागार जनसंपर्क अधिकारी पशुधन विकास अधिकारी, जकात अधिकारी, संस्कृतीक अधिकारी, क्रीडा अधिकारी आहेत त्यांना 5 वर्षा पासून एकाच पदावर आहेत. अशांनाही पुढील वेतन श्रेणी निश्चित करण्या बाबत याच प्रस्तावात उल्लेख करण्यात यावा.

श्री. अलफखाँन हुसेनखाँन :- आर/आर मजूर करण्यात आलेले आहे काय? आर/आर आम्हास मंजूर नाही माझे एकच म्हणणे आहे की, ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीसाठी 5 वर्षाचा काळ बाकी आहे. अशा कर्मचारी /अधिकारी वर्गाना पदोन्नती नंतर जी वेतन श्रेणी देण्यात येते ती वेतनश्रेणी कर्मचारी / अधिकारी यांना देण्यात यावे. अशी या प्रस्तावात दुरुस्ती व्हावी असे आहे. त्यात कोणतही पदाचे कर्मचारी / अधिकारी असोत सर्वांनाच याचा लाभ व्हावा.

श्री. अजित जागिरदार :- स.सदस्य श्री. अलफखाँन यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्यास माझा विरोध नाही आहे परंतु त्यात माझे एक सजेशन आहे की जो अधिकारी /कर्मचारी यांचा सेवा निवृत्तीचा काळ 5 वर्ष बाकी राहीलेला त्यांनी पुढील पदोन्नतीच्या वेतन श्रेणीचा लाभ व्हावा. परंतु जे कर्मचारी / अधिकारी स्वेच्छेने व्हालंट्री निवृत्ती घेतात. त्यांच्या जागेवर दुसऱ्याची नियुक्ती होते अशाचाही यामध्ये विचार व्हावा.

श्री. शंकर मगर :- स. सदस्य श्री. महादेव सुर्यवंशी यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. की उप आयुक्तांच्या पदाच्या निर्मिती बाबत. मा. आयुक्तानी जर गजर भासेल तर असे सुचवले तेव्हा जर आणि तर कशासाठी मग विषय क्र. 7 ची काय गरज आहे. या सहा लाख जनतेच्यासाठी उप आयुक्तांचे पदही आवश्यक आहे.

मा. महापौर : आताच मा. आयुक्तांनी या बाबत आपले मत नोंदविलेले आहे. की प्रशासना मार्फत प्रस्ताव तयार करून शासनाकडे दाखविण्यात आलेला आहे. व त्यांची मंजुरी अद्यापही आलेली नाही. आल्यानंतर प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यात येईल.

श्री. महादेव सुर्यवंशी : आपल्या मनपा कर्मचाऱ्यांमधून जेष्ठता सुची नुसार उप आयुक्तांचे पद का निर्माण करण्यात येत नाही.

मा. महापौर : स. सदस्य यांचे सुचने नुसार आपल्याला या पुर्वीच मा. आयुक्तांनी सांगितले आहे की, उप आयुक्तांचे पदा बाबत प्रशासनाने प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. आणि शासनाकडील मंजूरी आल्यास पद जेष्ठता सुची नुसार भरण्यात येईल. शासनाकडून मान्यता मिळून कधीपर्यंत येईल याची खात्री नाही. यासाठी आपण सर्वातो प्रयत्न करणे आवश्यक आहे. आणि प्रशासनास वाटेल तर मा. आयुक्त या बाबत कार्यवाही करुन सहा महिन्यासाठी पदावर नियुक्ती करतील.

श्री. गिरजाराम हाळनोर : उप आयुक्त पदाच्या संदर्भात प्रशासनाने एका वर्षा पासून शासनाकडे पत्र व्यवहार केलेला आहे. तेव्हा माझ्या माहिती प्रमाणे प्रशासनाकडे शासनाकडील उप आयुक्त पदासाठीचा पत्रव्यवहार झालेला आहे. आणि त्यांचे उत्तर आलेले आहे. त्यांची माहिती द्यावी.

मा. महापौर : या बाबत उप आयुक्त यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त : उप आयुक्तांचे जे अतिरीक्त पद आहे. त्या बाबत शासनाचे जे पत्र आलेले होते. त्यामध्ये असे होते की, आमच्याकडे कार्पोरेशनचा ठराव करुन पाठवा . त्यानंतर आम्ही असे लिहीलेले होते की, प्रशासकिय प्रस्ताव पाठविलयाने पुन्हा कार्पोरेशनचा ठराव घेण्याची आवश्यकता नाही. त्यानंतर ते शासनाने मान्य केले. व पुन्हा शासनाकडे सदरील पदाची जागा निर्माण करण्यासाठी पत्र पाठविण्यात आलेले आहे.

श्री. इस्माईलः कोणत्याही पदासाठीचे कर्मचारी /अधिकारी असोत त्यांचे कोणतेही हेड असो त्यांना पुढील वेतन श्रेणी निवृत्तीच्या अगोदर मिळण्यासाठी प्रस्ताव मान्य होणे आवश्यक आहे.

श्री. अलफखॉन : मी पुन्हा आपल्याला सांगु इच्छितो की, आपल्या कॉर्पोरेशनमध्ये प्रमोशन चॅनेल जास्त प्रमाणात नाही आहेत. तेव्हा निवृत्तीच्या किमान पाच वर्षापुर्वी जर संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांना पुढील पदोन्नतीची वेतनश्रेणी मिळाली तर कर्मचाऱ्यांना फायद्याचे होईल. उदा : उप आयुक्त पद एकच आहे. आणि झोन अधिकारी सात सहाय्यक आयुक्त दोन असे असल्याने केवळ त्यांच्यातून एकाचीच जेष्ठता सुची नुसार नियुक्ती होईल. व बाकी तसेच राहतील. यासाठी सदरील प्रस्ताव आपल्या समोर दुरुस्तीसाठी ठेवण्यात आलेला आहे. काही कार्यालय असे आहेत की, उदा : फॉरेष्ट, रेव्हेन्यु, तहसिल कार्यालयात वर्ग 1 पर्यंत कर्मचारी पोहचतात आणि मनपातील कर्मचारी शेवट पर्यंत एकाच पदावर काम करीत बसतो यासाठी सर्व कर्मचाऱ्यांचा विचार आपण करणे आवश्यक आहे. आणि त्या नुसार कार्यवाही करणे बाबत मंजूरी द्यावी.

श्री. स. हूसेनः काम करणारे कर्मचारी असतात. बरेचसे हुशार आणि कर्तव्यदक्ष असतात. एखादा कर्मचारी काम चुकार राहतो. परंतू प्रमोशन पॅनल अभवी चान्स नसल्यास अशा हुशार कर्मचाऱ्यास त्याच ठिकाणी रहावे लागते. त्यामुळे अशा कर्मचाऱ्याच्या मेहनतीसाठी वेतन श्रेणी वाढवून देणे उचित होईल.

श्री. मोहसिन अहमद : स.सदस्य श्री. रफत आणि श्री. अलफाखॉंन यांनी जे सुचविले त्यांची मी प्रशंसा करतो.

श्री. प्रदिप जैस्वाल : यापुर्वी मी ज्यांचे नांवे सुचविले त्या सर्वांच्या पदाची नोंद घ्यावी.

श्री. अलफखॉंन हूसेनखॉंन : यामध्ये कुणाचेही नाव घेणे ठिक नाही. तर केवळ वर्ग 2 व वर्ग -1 चा समावेश राहील.

श्री. अजित जागिरदार : व्हॉलंट्री रिटायरमेंट जे कर्मचारी / अधिकारी घेतात त्यांचेसाठी एक नियमावली तयार करण्यात यावी. की ज्यावेळी पदे रिकामी होतील त्यांची नियुक्ती करण्यात येइल त्या बाबत.

श्री. चंद्रकांत खैरे : स.सदस्य श्री अलफखॉन यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्यास स.सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांनी उप सुचना मांडलेली आहे. तेव्हा त्या प्रस्तावात काही दुरुस्ती करुन पुढील बैठकीत ठेवण्यात यावे.

श्री. अलफखॉंन हूसेनखॉंन : स. सदस्य श्री. चंद्रकांत खैरे यांनी अद्यापही समजून घेतलेले दिसत नाही. केवळ वर्ग -2 चे जे अधिकारी आहेत त्यांचा सेवा निवृत्तीचा काळ 5वर्षाचा राहील्यास त्यांना वर्ग -1 च्या वेतन श्रेणीचा ग्रेड देण्यात यावा असा आहे.

मा. महापौर : मनपाच्या आर्थिक बोजाचा प्रश्न आहे तेव्हा सदरचा प्रस्ताव पुढील बैठकीत दुरुस्तीसह ठेवण्यात येइल. कारण बोनसचाही प्रश्न आहे बाहेर कर्मचारी

उपोषणाला बसलेले आहेत. त्यांना बोनस वाढवून देता येत नाही. तर हा नविन प्रस्ताव आताच पुढे कशाला?

मा. आयुक्त : स. सदस्यांना माझी विनंती आहे. आपण कोणत्याही पोस्टला जेव्हा उपग्रेड करतो तो माणूस फक्त पाच वर्षात रिटायर्ड होणार आहे. तर म्हणून आर्थिक बोजा देण्यासाठी करतो. मला वाटते हा प्राथमिक भुमिका चुकीचा आहे. पोस्ट उपग्रेड करतांना कामाचा जर व्याप वाढला असेल तरच पोस्ट उपग्रेड करायची आहे. माणूस जेव्हाए नोकरीला औरंगाबाद कार्पोरेशनमध्ये आले तर ते कम विथ ऑफ दि कडिश्न की काय इथे आहे काम काय नाही सगळ विचार करुन आलेले आहेत. आणि इथे जे शुडनॉट बी शुअरिटो ते पाच वर्षात रिटायर्ड होणार आहेत म्हणून त्याला अपग्रेड दिला पाहिजे काम वाढत असेल तर नक्की वुई हॅव टू क्रियेट पोस्ट म्हणजे काय, एक ग्रेड वरुन दोन ग्रेडवर पाहिजे तर करायला पाहिजे. या सर्व गोष्टी विचार करुनच केला तर मला वाटते ते बर होईल. ऑदर दॅन थिंकींग ते रिटायर्ड होणार आहोत. म्हणून करायच मला आय पर्सनलि डोंन्ट ॲग्री विथ धिस बाकीचे याच्यात डिसीजन घ्यायचे असेल  माझे मत हे आहे.

श्री. नरेंद्र पाटील : मा. आयुक्तांनी जे सुचित केलेले आहे. त्यांच्याशी मी पुर्णपणे सहमत आहे. कारण आपण कोणताही निर्णय घेत असतांना त्यांचे दुष्परिणाम किंवा परिणाम काय होतील यांचीही विचार करणे आवश्यक आहे. कारण एका कर्मचारी/ अधिकाऱ्यांच्या हा प्रश्न नसून दर वर्षी जवळपास 25-30 कर्मचारी निवृत्त होत असतात. मग आपण अशा प्रकारची वेतनश्रेणी देऊ केल्यास मनपाला आर्थिक बोजा परवडणार नाही. हा प्रश्न आताचा नसून भविष्यात मनपाचे काय होईल सांगता येणार नाही.

मा. महापौर : स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या बद्दल काही सुचवायचे नाही, परंतू स.सदस्य श्री. अलफखाँन यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे. तो प्रस्ताव सर्वोंच्या विचाराधिन  पुढील बैठकीत ठेवण्यात येईल. त्यावर सभागृहात योग्य त्या दुरुस्त्यासह निर्णय देईल तो मान्य करता येईल आता या बाबत जास्त चर्चा करण्यात येऊ नये.

पंधरा मिनिटांसाठी सभा तहकुब करण्यात येते. (अंदाजे वेळ 2:40)

**विषय क्र. 39/7 :** मा. आयुक्त महानगरपालीका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रकल्प विभाग झोपडपट्टीवासियांच्या सर्वागिण विकासासाठी  कार्यरत आहे. औरंगाबाद मनपा हद्दीतील 68 झोपडपट्टीतून सुमारे दिड ते पावने दोन लाख लोकसंख्या आहे. झोपडपट्टी वासियांसाठी नेहरु रोजगार योजने अंतर्गत घर दुरुस्ती,युवक, महिलांचे प्रशिक्षण, त्यांना कर्ज मिळवून देणे स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करुन त्यांना स्वावलंबी होण्यास मदत करणे वैयक्तीक घर दुरुस्ती योजना सामूहीक झोपडपट्टी श्रेणीतवाढ योजना कमकुवत घरकल्याण कार्यक्रम मनपा ला मधील सर्व जांती धर्माच्या हूषार विद्यार्थ्यांसाठी विनामुल्य शालेय साहित्य पुरविणे, झोपडपट्टीतील महिलासाठी शिक्षणकला प्रशिक्षण माता, बाल संगोपण, आरोग्य शिबीरे, समाज शिक्षण देणे, मनपा चतूर्थश्रेणी कर्मचा-यांना स्वतःचे घरकुल योजना कर्मचा-यांसाठी प्रोत्साहन पुरस्कार, वसनालये, अभ्यासिका असे असंख्य उपक्रम प्रकल्पातर्फे राबविले जातात हया विभागाच्या कामाचा व्याप व जबाबदारी दिवसेंदिवस वाढत आहे.

पुणे मनपा मध्ये प्रकल्प संचालकांचे रु 3200-100-125-6425 (अधिक रु1200/- 4625 द.म.कार अलौन्स) अशा वेतनश्रेणीत पद आहे. मनपा औरंगाबादमधील प्रकल्प

अधिकारी या पदास पदौन्नतीची संधी नाही व एका अर्थाने ह्या पदास नैसर्गिक न्यायापासून वंचित रहावे लागेल. मनपा औरंगाबादसाठी कर्मचारी सेवा भरती नियमामध्ये प्रकल्प संचालक पदासाठी रु.1000-1500 ही वेतनश्रेणी प्रस्तावीत आहे. सुधारीत वेतन श्रेणी 42 या वेतन आयोगानुसार रु. 3000-4500/- अशी आहे.

वरिल सर्व बाबींचा विचार करुन मनपा औरंगाबाद अस्थापनेवर प्रकल्प संचालक हे पद रु 3000-4500/- हया सुधारित वेतन श्रेणीत निर्माण करण्यात यावे. प्रस्ताव मान्य झाल्यास शासनाकडे पाठविण्यात येइल. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर .

**ठराव क्र. 39/7:** प्रस्ताव दर्शविल्या नुसार प्रकल्प विभाग झोपडपट्टीवासियांच्या सर्वांगिण विकासाठी कार्यरत आहे. मनपा हद्दीतील 68 झोपडपट्टीतून सुमारे दिड ते पावणे दोन लाख लोकसंख्या आहे. झोपडपट्टी वासियांसाठी प्रकल्प विभाग अंतर्गत विविध उपक्रम राबविले जातात. उदा : नेहरु रोजगार योजने अंतर्गत घर दुरुस्ती युवक महिलांचे प्रशिक्षण त्यांना कर्ज मिळवून देणे, स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करुन त्यांना स्वावंलबी होण्यास मदत करणे, वैयक्तिक घर दुरुस्ती योजना सामुहिक झोंपडपट्टीश्रेणी वाढ योजना कमकुवत घटक कल्याण कार्यक्रम मनपा शाळा मधील सर्व जाती धर्माच्या हुषार विद्यार्थ्यांसाठी विनामुल शालेय साहीत्य पुरविणे, झोपडपट्टीतील महीलानसाठी शिवण कला प्रशिक्षण, माता बाल संगोपण , आरोग्य शिबिरे समाजशिक्षण देणे मनपा चतुर्थश्रेणी कर्मचा-याना स्वतःचे घरकुल योजना कचा-यासाठी प्रोत्साहण पुरस्कार, वाचनालये, अभ्यासिंका असे असंख्य उपक्रम होत. आदी बाबत कामाचा व्याप लक्षात घेता. मनपाच्या अस्थापणे वर प्रकल्प संचलक हे पद रु 3000 ते 4500 या मूळ प्रस्तावातील वेतनश्रेणीत दुरुस्ती करून रु. 2200-4000 ही सुधारित वेतनश्रेणी निश्चित करून प्रकल्प संचालक पदास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.
(सभेला सुरवात अंदाजे 2-40 वाजता)

# <u>पुरवणी विषय पत्रिका</u>

**विषय क्र. 40/8 :** औरंगाबद महानगरपालीका प्रशासनाकडून झालेल्या भ्रष्टाचाराची महाराष्ट्र शासनाकडून चौकशी आयोग नमून चौकशी करण्यात यावी उदा. स्विमिंग पुल, नाथ मार्केट, सिडको पाणी पुरवाठा विभाग.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | श्री. विठ्ठल कोंडाची पेरकर |
| अनुमोदक | - | श्री. प्रभाकर सिताराम विधाते |
| दिनांक | - | 15/06/91 |

**संवाद**

प्रदिप जैस्वाल : संबधीत प्रस्तावाचे सुचक नसल्याने प्रस्ताव रद्द करण्यात यावा.
मा. महापौर : ठिक आहे. प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**ठराव क्र. 40/8 :** सदरील प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र. 41/9** : महानगर पालीका अधिकारी यांच्या सेवा भरती नियम तयार करण्याकरीता एक समितीचे गठण करण्यात यावे. सदर समितीने त्यांच्या कार्याचा अहवाल दोन महिण्याचे आंत सर्वसाधारण सभेसमोर अंतिम मंजूरीस्तव सादर करावा.

सुचक - श्री. अलफखॉ हूसेनखॉ
अनुमोदक - श्री. अजिज जहागिरदार.

**संवाद :**
श्री. प्रदिप जैस्वाल : या प्रस्तावाचे अनूमोदक नसल्याने प्रस्ताव रद्द समजण्यात यावा.
मा. महापौर : प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**ठराव क्र. 41/9** : सदरील प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र. 42/10** : औरंगाबाद शहराच्या वाढता विकासा बरोबर हॉटेलची संख्या ही वाढत आहे. तेव्हा महानगरपालीका हद्दीतील सर्व हॉटेल्सचे वर्गिकरण (ग्रेडेशन) करण्यात यावे.
सुचक - सौ. लता दलाल
अनुमोदक - श्री. केशव सोनवणे.
दिनांक - 12/08/91

**संवाद :**
सौ. लता दलाल : औरंगाबाद शहराच्या वाढता विस्तार लक्षात घेता शहरातील हॉटल्सची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. तेंव्हा विनंती की, येथील हॉटेल्सची वर्गिकरण (ग्रेडेशन) करण्यात यावे. आणि अशा हॉटेल्स संदर्भात संबंधित विभागांनी माहिती द्यावी.
मा.महापौर : संबंधित अधिका-यांनी खुलासा करावा.
सौ. लता दलाल, श्री. विठ्ठल पेरकर : संबंधित अधिकारी सभागृहात दिसत नाहीत.
मा. महापौर :- संबंधित अधिकारी सभागृहात उपस्थित नसल्याने संबंधितांना ‘‘शो कॉज’’ नोटीस देण्याचे मा. आयुक्तांना कळविण्यात यावे.
श्री. प्रदिप जैस्वाल : संबंधित अधिकारी सुट्टीवर असतांना आपण तसे करणे योग्य नाही. मुंबई मनपा अधिनियम ४३/३ प्रमाणे सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समिती सभे मध्ये संबंधित अधिकारी उपस्थित राहणे, आवश्यक नाही. आणि त्यामुळे आपण‘‘शो कॉज’’ नोटीस देणे आवश्यक नसून सभेमध्ये सचिव किंवा उपआयुक्तांनी या बाबत खुलासा करावा.
मा. महापौर : संबंधित अधिकारी सुट्टीवर आहेत. याची सभागृहाला माहिती नाही. करिता संबंधितांना ‘‘शो कॉज’’ नोटीस देऊन विचारणा करावी.
श्री. केशव सोनवणे : सभागृहाला संबंधित अधिकारी आहेत. याची कल्पना नसल्याने त्यांना शिक्षा म्हणून ‘‘शो कॉज नोटीस’’ देणे योग्य राहील आणि प्रस्तावावर पुढील बैठकीत चर्चा करावी. तो पर्यत प्रस्ताव स्थगित ठेवावा.
मा. महापौर : सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**विषय ४३/११ :** संत एकनाथ रंग मंदिरातील आसन व्यवस्थेत महापालीका अधिकारी कर्मचारी व नगर सेवक यांच्या साठी किमान दहा (१०) आसन राखुन ठेवावेत व त्यासाठी पासेस द्यावेत . त्यासाठी शुल्क आकारु नये.

सुचक - सौ. लता दलाल
अनुमोदक - श्री. केशव सोनवणे
दिनांक - १२/०८/९१

**संवाद :**

सौ. लता दलाल : संत एकनाथ रंग मंदिर हे महानगरपालीकेचे असल्याने येथे अनेक सांस्कृतिक कार्यक्रम होतात. परंतू कलेक्टर कार्यालयातील कर्मचा-यांना जसे सिनेमागृहात आसन राखिव ठेवण्यात येतात त्याच प्रमाणे म.न.पा. नगर सेवक, कर्मचारी अधिकारी यांच्या साठीही सांस्कृतीक कार्यक्रमात भाग घेण्यासाठी किमान दहा आसन व्यवस्था राखीव ठेवाव्यात व पासेस द्यावेत. कोणत्याही प्रकारची शुल्क आकारण्यात येऊ नये.

श्री. अजिजूल्ला बेग :संबंधित प्रस्ताव योग्य किंवा अयोग्य याबाबत प्रशासनाने ठरविणे आवश्यक असेते. या संदर्भात अधिका-यांनी माहिती द्यावी.

मा. महापौर : संबंधित अधिका-यांनी किंवा उप आयुक्तानी खुलासा करावा.

उप आयुक्त : या संदर्भात मनपाची नियमावली तयार आहे. त्यांत या बाबत आपल्या सुचने प्रमाणे करावयाचे झाल्यास दुरुस्ती करावी लागेल.

मा. महापौर : स. सदस्यांनी मांडलेल्या प्रस्तावानुसार माझ्या मते योग्य नसून मनपाच्या रंग मंदिर मध्ये स सदस्य किंवा अधिका-यांना सांस्कृतिक कार्यक्रमास जावयाचे असल्यास एक दिवस अगोदर माझ्याकडे किंवा संबंधित अधिकारी यांचेकडे माहीती दिल्यास आपल्याला सांस्कृतीक कार्यक्रमास उपस्थित राहणे बाबत पासेस किंवा व्यवस्था करण्यात येईल. परंतू अशा प्रकारचा प्रस्ताव करणे ठिक नाही. सांस्कृतिक करणेसाठी आपण भाड्याने दुसऱ्याला देत असल्याने आपले त्यांचेवर बंधन नाही. करिता आपण कळवाल ज्यावेळेस आपल्याला प्रवेश देता येईल.

श्री. प्रदिप जैस्वाल : सांस्कृतीक कार्यक्रम हा तिकीट दराने होत असल्याने आपला हक्क तसा पोहोचत नाही. तेव्हा सदरील प्रस्ताव योग्य वाटत नाही.

**ठराव ४३/११ :** सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**विषय क्र. ४४/१२** : सि.स. न. १९६०२ मधील ४० फुटी रत्स्यासाठी केलेले आरक्षण रद्द करण्यात यावे.

सुचक - सौ. लता दलाल
अनुमोदक - श्री. प्रभाकर विधाते
दिनांक - ६०/९०/९१

**संवाद :**

मा. महापौर : अनुमोदक नसल्याने सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**ठराव :-** सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**विषय क्र. ४५/१३** औरंगाबाद महानगरपालीके मार्फत रेल्वे स्टेशन चौकात माजी पंतप्रधान कै. राजीव गांधी भारत रत्न यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यात यावा. या चौकात राजीव

गांधी यांचा पुर्णाकृती पुतळा उभारल्यास बाहेर गावाहून येणा-या नागरिकांना आपल्या लाडक्या नेत्याचे दर्शन होइल. त्यांचे स्मरणात सदैव आठवण राहील कै. राजीव गांधी यांचे कार्य औरंगाबाद वासियांना सदोदित आठवणीत रहावे म्हणून वरील चौकात कै.राजीव गांधी माजी पंतप्रधान यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे बाबत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक - श्री. अलफखॉन हूसेनखॉन
अनुमोदक - श्री. धनंजय गंगाखेडकर
श्री. नरेंद्र पाटील
दिनांक - १२/०९/९१

**संवाद** :-

मा. महापौर : सदरील प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव ४५/१३ :** प्रस्तावात दर्शिवल्या प्रमाने औरंगाबाद महानगर पालीके मार्फत रेल्वे स्टेशन चौकात माजी पंतप्रधान, भारत रत्न कै. राजीव गांधी यांचे काय सदोदित आठवणित रहावे म्हणून कै. राजीव गांधी यांचा पुर्णाकृती पुतळा रेल्वे स्टेशन चौकात उभारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ४६/१४ :** दिल्लीगेट येथील आरक्षण क्र. ३२ मधील मनपाने बांधलेल्या कंपाऊंड वॉलचा उत्तरेकडील मिळकत भुसंपानातून व जाहीर झालेल्या निवाडयातून कायमचे रद्द करणे बाबत.

सुचक - श्री. धनंजय गंगाखेडकर
अनुमोदक - श्री, अलफखॉ हूसेनखॉ
दिनांक - १३/०९/९१

**संवाद** :

मा. महापौर : संबंधित प्रस्तावाचे सुचक नसल्याने प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**ठराव क्र ४६/१४** : सदरील प्रस्ताव रद्द कण्यात यावा.

**विषय क्र. ४७/१५** : ठराव क्र. १ समी कॉलनी, वार्ड क्र.३५ महानगरपालीकेचे सर्व सुखसोई उपलब्द करुन देऊन अंदाजे २० वर्षे झाली आहेत. सदरील भागात नळ, ड्रेनेज व कर आकारणी गेली २०वर्षे पासून मनपा घेत आहे. सदरील भाग औरंगाबाद विकास योजना अंतर्गत आरक्षण क्र.४४ पार्क राखीव असल्याने परवानगीस अडथळा निर्माण झाला आहे. सदरील आरक्षण क्र.४४ मधील एक ही ओपन प्लॅट नाही. तेथे गेले अनेक वर्षा पासून वस्ती झालेली आहे. तरी सदरील भागास आरक्षण पार्क वगळून समी कॉलनी वासियांना घरे बांधण्याची परवानगी देऊन उपकृत करावे, ही विनंती. समी कॉलनी नागरीकांनी गेले अनेक वेळा आपणाकडे विनंती केलेली आहे. तरी मंजूरीस्तव सादर.

सुचक - श्री. मोहसिंन अहमद
अनुमोदक - श्री. बंडू प्रधान
दिनांक - १३-०९/९१

**ठराव क्र. ४७/१५** :- सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा

**संवाद :**

मा. महापौर :- सदरील प्रस्थावाचे अनुमोदक नाही.

**प्रस्ताव क्र. ४८/१६ :** औरंगाबाद शहराची वाढ द्रूत गतीने होत असून त्या शहरातील विविध स्थरातील जनतेसाठी मनोरंनाची ठिकाणे फारच कमी आहेत. त्या दृष्टीने औरंगाबाद महानगरपालीके मार्फत शहरात अद्यावत व सुसज्ज असे नाटयग्रह बांधण्यात यावे. जेणे करुन नगर वासियांची मनोंरनाची अडचण दुर होईल. तसेचस यामुळे महानगरपालीकेचे आर्थिक उत्पन्न देखिल वाढेल.

सुचक - श्री. आ.चंद्रकांत खैरे
श्री. अजित जहागिरदार
अनुमोदक - श्री. गिरजाराम हाळनोर
श्री. विठ्ठल पेटरक

**संवाद :-**

मा. महापौर :- सदरील प्रस्तावाचे सुचक अनुमोदक नसल्याने प्रस्ताव रद्द करावा.

**ठराव क्र. ४८/१६ :** सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**विषय क्र. ४९/१७ :** औरंगाबाद शहरात दिवसेंदिवस पर्यटकांची गर्दी वाढत असून त्यांना शहरात थांबण्यासाठी कुठेलेही स्वस्त हॉटेल नाही. या बाबिंचा विचार करता शहरात अद्यावत व सुसज्ज असे विश्रांतीगृह बांधणे अत्यत आवश्यक आहे. औरंगाबाद शहरात मजनु हिल परिसरात औरंगाबाद महानगरपालीका मार्फत अद्ययवत व सुसज्ज असे विश्रांतीगृह बांधण्यात यावे, जेणे करुन शहरात नेहमी येणारे प्रतिष्ठीत व्यक्ती, पर्यटक तसेच साहित्यक, थोर विचावंत व सर्व स्थरांतील व्यक्तींना राहण्यासाठी निवासाची सोय उपलब्द होईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक - श्री. आ.चंद्रकांत खैरे
अनुमोदक - श्री. अजिज जहागिरदार
श्री. गिरजाराम हाळनोर
श्री. जयवंत ओक
दिनांक - १६/०९/९१

**संवाद :**

श्री. प्रदिप जैस्वाल : संबंधीत ठिकाणी मनपा तर्फे विश्रांतीगृह बांधण्यात येऊ नये. यास माझा विरोध आहे. हे ही माहित आहे की, विश्रांतीगृहासाठी रु १० लाखाची तरतूद अंदाजपत्रकात केलेली आहे.

श्री. नरेंद्र पाटील : मजनू हिल हेच स्थळ का निवडण्यात गेले., माझ्या मते रेल्वे स्टेशनला मनपाचे जे विश्रांतीगृह आहे. त्यालाच व्यवस्थीत रिपेअर करुन बांधलेतर बरे होईल.

अजिज जहागीदार :- रेल्वेस्टेशन विश्राती गृह जे आहे ते. सर्व सोईयुक्त नसल्याने या पेक्षा मजनू हिल ही जागा जि निवडलेली आहे. ते उंचावरील भाग असल्याने त्या ठिकाणचा परिसर वेगळाच राहील. करीता हा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

श्री. कचरु नवपूते :- सदरील प्रस्तावास माझा विरोध आहे. यासाठी वार्डाची समस्या सोडविण्यासाठी खर्च करण्याचे अधिकार आहेत. जर करावयाचे झाल्यास चिकलठाणा येथे विश्रांती गृह बांधण्यात यावे. कारण त्या ठिकाणी विमानतळ आणि रेल्वेस्टेशन असल्याने पर्यटकांची संख्या वाढेल.

श्री. स. हूशेन स. अहमद : या प्रस्तावसाठी अंदाजपत्रकात किती पैसे शिल्लक आहेत याची पाहणी करावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : रु.१० लाखांचे तरतुद अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे.

मा. महापौरः या संदर्भात झोनिंगचे पाहणी करण्यात येईल मा. आयुक्त या बाबतचे योग्य ती कार्यवाही करतील. प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

**ठराव ४९/१७** : प्रस्तावात दर्शविल्या नुसार औरंगाबाद शहरात दिवंसेन दिवस पर्यंटकांची गर्दी वाढत असून त्यांना शहरात थांबण्यासाठी कुठलेही हॉटेल नाही. या बाबींचा विचार करता झोन वाईन जागेची सविस्तर पाहणी करुन सुसज्ज असे, विश्रांतीगृह बांधण्यास मा. आयुक्त कार्यवाही करतील यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र ५०/१८ :** औरंगाबाद महानगरपालीकेच्या हद्दीत वाढ करुन वाळूज येथील सर्व औद्योगिक कारखाने, कंपन्या समाविष्ठ करणे बाबत. कारण वाळूज परिसरात मोठ मोठाल्या कंपन्या, कारखाने नव्याने उघडत असून शहरात कारखांन्यासाठी लागणारी कच्चा माल मोठ्या प्रमाणात आयात होतो. सदर क्षेत्र सद्या महानगरपालीकेच्या हद्दीत नसल्यामुळे या मालावर जकात कर आकारला जात नाही. हा विभाग औरंगाबाद महानगरपालीकेच्या हद्दीत समाविष्ठ झाल्यास महानगरपालीकेच्या जकात उत्पन्नात फार मोठ्या प्रमाणात वाढ होईल. तरी महानगरपालीकेची हद्द वाळूज पर्यंत वाढविण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | आ.श्री. चंद्रकांत खैरे |
| | | श्री. अविनाश कुमावत |
| अनुमोदक | - | श्री. गिरजाराम हाळनोर |
| | | श्री. अजिज जहागिरदार. |
| दिनांक | - | १६/०९/९१ |

**संवाद :**

मा. महापौर :- सदरील प्रस्तावाचे सुचक व अनुमोदक नाहीत.

**ठराव क्र. ५०/१८ :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

**विषय क्र. ५१/१९:** औरंगाबाद शहरात आयात होणाऱ्या सौदर्य प्रसाधने, महिलांच्या बांगड्या व लहान मुंलांची खेळणी या मालावर जकात कर माफ करणे बाबत तथा जकात कर कमी करणे बाबत. कारण या मालाची किंमत फार कमी असते. परंतू जकात जास्त आकारल्यामुळे स्थानिक करासह सौदर्य प्रसाधने,महिलांच्या बांगड्या व लहान मुलांची खेळणी यांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ होते. या वस्तूवर जकात कर माफ केल्यास जकात उत्पन्नात विशेष फरक पडणार नाही.

शहरात आयात होणाऱ्या जिवनावश्यक औषधी, टॉनिक्स व आयुर्वेदिक दवा यावर जकात कर पुर्णतः माफ करण्यात यावा, जेणे करुन शहरात राहणारे गरिब रुग्ण ही औषधी सहजरित्या खरेदी करतील व त्यांचे प्राण वाचेल. तरी वरिल वस्तू तथा जिवनावश्यक औषधावर जकात कर पुर्ण माफ करणे बाबत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | श्री. आ. चंद्रकांत खैरे |
| | | श्री. अविनाथ कुमावत |
| अनुमोदक | - | श्री. गिरजाराम हाळनोर |
| | | श्री. जयंवत ओक |

दिनांक - १६/०९/९१

**ठराव क्र. ५१/१९ :** सदरील प्रस्तावाचे सुचक अनूमोदक नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**प्रस्ताव क्र.५२/२० :** औरंगाबाद शहरातील हद्दीत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असून नविन एरिया बराच वाढलेला आहे. त्यातल्या त्यात झोपडपट्टी, लहान प्लॉटची वस्ती, लहान घरे, लहान रस्ते, गल्या, सांडपाणी रोड वरुन वाहते गटारी बांधल्या जातात. पंरतू सफाई कामगार नसल्याने अशा वस्त्यात साफ सफाई केल्या जात नाही. त्यामुळे शहरात रोगराईचे प्रमाण वाढत आहे. त्यासाठी अशा नविन वार्डासाठी कमित कमी १० सफाई कामगार नेमून द्यावे जेणे करुन ज्या प्रमाणे शहराची सफाई होते. त्याच प्रमाणे शहराच्या इतर भागाचे देखील साफसफाई होईल. ठराव मंजूरीस्त सादर.

सुचक - श्री. शंकर मगर
अनुमोदक - श्री. सुभाष परदेशी
श्री. महादेव सुर्यवंशी
दिनांक - १६/०९/९१

**संवाद :**

श्री. शंकर मंगर : औरंगाबाद महानगरपालीका हद्दीत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असून शहरालगत नविन एरिया बराच मोठा झालेला आहे. यासाठी गेल्या ३ वर्षा पासून आमची मागणी आहे की, बाकीच्या विभागातील साफसफाई दररोजची होण्यासाठी आणि शहरात रोगराईचे प्रमाण वाढू नये यासाठी कमित कमी दहा सफाई कामगारांची नेमणूक या भागासाठी करुन दुपारच्या सत्रात काम केल्या जाऊ शकते, कारण सकाळच्या सत्रामध्ये काम करणारे कर्मचारी अपूरे असल्याने त्यांचे कडून पुर्ण एरिया कव्हर होतच नाही. करीता वाढीव कर्मचारी दिल्यास बरे होईल.

श्री. अजिजल्लाः प्रस्ताव चांगला आहे. परंतू मागे असे केलेले होते, काही भागासाठी स्पेशल स्कॉट लेबर कॉन्ट्रॉक्टद्वारा करुन शहरातील साफ सफाई केल्या जात होती. त्या पद्धतीने करण्यात यावी. केवळ दहा कर्मचाऱ्यांची नेमणुक करणे चुकीचे आहे.

श्री. स. हूसेन स. अहमद : झोन ३ मध्ये बरेचसे वार्ड येतात आणि या वार्डामध्ये साफ सफाई करण्यासाठी कर्मचारी वर्ग अपुरा पडतो तेव्हा अशा प्रकारच्या प्रस्तावास मान्यता दिल्यास ठिक होईल.

मा. महापौर : या बाबत मा. आयुक्त खुलासा करतील.

मा. आयुक्त : ये सब एक्झमिन करके ही बताया जायेगा / इमिडीयेटली असे दस के लिये वैसे पंधरा बोल दिये मंजूर करना ठिक नही होता./ काम देखके पुरा बोलते / हम अगली बारमे पुटअप कर देंगे.

श्री. शंकर मगर : मी यापुर्वी मा. उप आयुक्तांना दहा ते पंधरा पत्र दिलेले आहे. जे या ठिकाणी माझ्या वार्डामध्ये साफसफाई करण्यासाठी कमीत कती रोजंदारीवर कर्मचारी लावून कामे करवून घेण्यात यावी, पंरतू त्यांचे कडून साधे उत्तरही प्राप्त झाले नाही. याचा अर्थ काय? या साठी मा. आयुक्तांनी स्पष्ट खुलासा करणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त : मी सांगितलेले आहे प्रथम एक्झामिन करून करता येईल. आपण प्रस्ताव करून पाठवा. त्यानंतर एक्झामिन करून प्रस्ताव ठेवण्यात येईल. आता एकदमच मी खुलासा कसा करीन.

श्री. महादेव सुर्यवंशी : गेल्या तीन ते साडेतीन वर्षा पासून झोन ५ मध्ये केवळ ३२ कर्मचारी काम करित आहे. या झेन मध्ये आंबेडकरनगर, सिडको, नारेगांव, चिकलठाणा आणि औद्योगिक पसिरातील आजू बाजूचा भाग यतो. हा सर्व झाने-५ च्या हद्दिन येत असल्याने एवढ्या कमी कर्मचाऱ्यांकडून कामाची व्यवस्था होत नाही. ही मागणी आम्ही बरेच दिवसांपासून करीत आहोत. त्याच प्रमाणे केर कचरा वाहुन नेणारी ट्रक नाही, एक ट्रक आहे. परंतु तिच्या एकाने सर्व भागातील कामे होतच नाही. जवळपास १५० ते २०० कर्मचारी या झेनमध्ये असणे आवश्यक असून केरकचरा वाहुन नेणारा ट्रकही जादा मिळणे आवश्यक आहे. कारण या भागात संपूर्ण पणे खेडगेगावाचा समावेश असल्याने सर्व साफसफाई दररोज होत नाही. याचा विचार करून सदरील प्रस्ताव जो ठेवलेला आहे तो योग्य आहे.

श्री. शंकर मगर : सदरच्या प्रस्तावावर चर्चा न होता प्रस्ताव जो ठेवलेला आहे तो चुकीचा आहे काय? याबाबत निर्णय का होत नाही.

मा. आयुक्त : याबाबत एक्झामिन करून संबंधित भागामध्ये किती कर्मचारी लागतात. दहा किंवा बारा हे पाहणी केल्यानंतर ठरवून पुढील बैठकीत माहिती देता येईल.

मा. महापौर : ठिक आहे. पाहणी करून पुढील बैठकीत माहिती देता येईल.

श्री. रशिद खान (मामू) : ड्रेनेज लाईनची पाईप लाईन व्यवस्था आहे. या संदर्भात पाहणी करण्यात यावी. आणि पुढील कार्यवाही करावी.

**ठराव क्र. ५२/२० :** प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे प्रत्यक्ष पाहाणी करुन पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.५३/२१ :** न्यु इंडिया को. हॉसिंग सोसायटीच्या मुख्य प्रवर्तक यांनी सि.स.न. १८३४९/१ हर्सूल येथील सर्व्हे नं. २१७ येथील पाच एक्कर जमिन ९९ वर्षाच्या लिजवर सोसायटीला द्यावी. अशी विनंती मनपाला केली आहे. तसेच वरील सोसायटीस सदरील जागा ९९ वर्षाच्या लिजवर देण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | श्री. ॲड. इकबालीसिंगगिल |
| अनुमोदक | - | श्री. केशव सोनवणे |
| दिनांक | - | १६/०९/९१ |

**संवाद :**

मा. महापौर : संबधीत प्रस्तावाचे अनुमोदक नाहीत.

**ठराव ५३/२१ :** प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**प्रस्ताव क्र. ५४/२२ :** महानगरपालीका अस्तिवात आल्यानंतर आज पर्यंत महानगरपालीकेचे नविन नळ कनेशन संबंधी उपविधी तयार करण्यात आलेले नाहीत. आणि सध्या म्युनिसिपल ॲक्ट १९६५ अन्वये पाणि पुरवठयाचे नियामाप्रमाणे आपल्या कडून नविन मंजूरी त्या नियमाप्रमाणे पाणि पुरवठा समिती द्वारेच हाऊ शकते, तरी नविन उपविधी मंजूर होई पर्यत नविन कनेक्यशन मु.प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे कलम ३१ अन्वये एक तदर्थ समिती

नियुक्त करुन त्या समिती मार्फत नविन नळ कनेक्शनची संचिका मंजुर करण्यात यावी. तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर

सुचक - श्री. अजिजुल्ला बेग
अनुमोदक - श्री. अजिज जहागिरदरा
दिनांक - १६/०९/९१

**संवाद :**

श्री. अजिजुल्ला : या प्रस्तावा संदर्भात माझे म्हणने आहे की, नविन नळ कनेक्शन संबंधी तथा रेग्युलर नळ कनेक्शन संबधी महानगरपालीकेचे उपविधी तयार करण्यात आलेली नाही. यासाठी आत्ता पर्यत जे चालू आहे ते म्युनिसिपल ॲक्ट १९६५ अन्वये पाणी पुरवठाचे नियमाप्रमाणे नवीन कनेक्शन देण्यात येत आहे. व या कनेक्शनची मंजूरी त्या नियमाप्रमाणे पाणि पुरवठा जी समिती असते त्या समिती द्वारेच होऊ शकते आणि सध्या महानगरपालीका आहे. तरीही पाणि आजपर्यत हापालीका पाणी पुरवठा नळ कनक्शन संबंधी कोणताही उपनिधी तयार केलेले नाही. करिता एक तर म्युनिसिपल ॲक्ट १९६५ ची अंमलबजावणी करावी किंवा मुंबई प्रा.अ.नि.१९४९ चे कलम ३१ चे अन्वये एक तटर्थ समिती नेमून तिच्या द्वारे संचिका मंजूर करुन घेण्यात याव्यात.

मा. महापौर : या बाबत विधी सल्लागारांनी खुलासा करावा.

विधी सल्लागार : मुंबई कार्पोरेशन ॲक्टचे शेड्युल्ड मधील चॅप्टर १० मध्ये वाटर सप्लाय बाबत नियम शासनाने मंजूर केलेले असल्यामुळे १९६५ चे कायद्याचे कार्यवाही करणे काही संयुक्तीक नाही कारण आपल्या कायद्यामध्ये पुरेपूर तरतूद दिलेली आहे. त्यामुळे जे नविन कोणते वॉटर कनेक्शन चॅप्टर १० मधील तरतुदी प्रमाणे देण्यात काही कायदेशिर अडचण नाही. प्रा. क्र. ३३७५ मध्ये मा. आयुक्तांना अधिकार आहेत आणि त्यांचे नियम आपल्याकडे मंजूर आहेत.

श्री. अजिजुल्ला बेग :- ॲक्ट मध्ये नियम आहेत त्या प्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे. यामध्ये बेटरमेंट चार्जेस आणि प्रॉपर्टी टॅक्सचे कोणतीही अट नाही. तर भोगवटा धारकास मा. आयुक्तांनी नोटीस द्यावयास पाहिजे की, नळ कनेक्शन घ्या म्हणून तेव्हा १९६५ चे नियमाचे कार्यवाही न करता नळ कनेक्शन संदर्भात चॅप्टर १० मधील तरतूदी नुसार कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : नियमा प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

मा. महापौर : ठिक आहृे. नियमा प्रमाणे कार्यवाही व्हावी.

**ठराव क्र. ५४/२२ :** प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे महानगरपालीका अस्तिवात आल्या नंतर आजपर्यंत मनपाचे नवीन नळ कनेक्शन संबंधी प्रतिनिधी तयार करण्यात आलेले नाहीत. यासाठी नविन नळ कनेक्शन संबंधी चॅप्टर १० मधील तरतुदी नुसार नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधनिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्र. ५५/२३ :** महानगरपालीकेच्या सर्व शाळामध्ये रिक्त असलेल्या ३०० शिक्षकाच्या जागा त्वरीत भरण्यात याव्यात.

सुचक - श्री. रशिदखान मामू
अनुमोदक - श्री. विठ्ठल पेरकर
दिनांक - ०९/१०/९१

**संवाद :**

श्री. रशिद मामू : महानगरपालीकेच्या शाळेमध्ये बऱ्याचशा शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. ज्यामुळे कित्येक मुले शाळा सोडून दुसऱ्या शाळेत प्रवेश घेतात. मागे काही २५/२६ शिक्षकांच्या जागा भरल्या व अजूनही १०४ शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. असे समजते. त्यानुसार शिक्षकमंत्री ज्यावेळस औरंगाबादला आले. त्यावेळी त्यांना या सदंर्भात विचारणा केली असता त्यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली की, मनपाकडे जर शिक्षकांच्या जागा रिक्त असल्यास त्यांनी जागा भरुन घ्याव्यात व शासनाकडे मंजूरीस्तव पाठवावे ती मंजूरी देण्यात येईली या बाबत खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : गव्हरमेंट के पास १२७ पोस्ट भरणे का मामला पडा हूआ है! गव्हर्नमेंटसे अप्रोल आणे की है जब मै दो तिन बार बॉम्बे, पुणा, गया हूॅ डायरेक्टर एज्युकेशनमे ये मामला उठाया है/ तो फिर उनकी मान्यता आ गयी तो हम ले लेंगे.

श्री. रशिद खॉन (मामू) : मा. शिक्षण मंत्र्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, मनपा खोटे बोलते आहे रिक्त पदे भरून शसनाकडे मंजुरीसतव पाठविण्यात यावे. याचा अर्थ मंत्री महोदय खोटे बोलले. तसे असल्यास ठराव पास करावे की, राजिनामा देणे बाबत. त्यावेळी स. सदस्य श्री. मोतीराम घडामोडे हे ही होते.

मा. आयुक्त : वो मै नही कर सकता। गव्हर्नमेंट के पास अपना रेफरन्स है। बडा क्लिअरली गव्हर्नमेंट अर्बन डेव्हलपमेंट अँड एज्युकेशन डिपार्टमेंटसे सहमती से जी. आर. निकलेगा जो हमे ॲथोराईज्ड करेगा, और उसके बाद हम भर सकते ।

श्री. मोतीराम घडामोडे : त्या ठिकाणी मी एक पत्रकार म्हणून उपस्थित होतो. मुख्यमंत्र्या समोर आम्ही शिक्षण मंत्र्यांना प्रश्न विचारला की, आपले धोरण शिक्षणाबद्दल चागले आहेत. पंरतू मनपाच्या शाळेसाठी ३०० शिक्षकांची पदे रिकामे आहेत त्यास मान्यता गेल्या ३ वर्षा पासून का दिले जात नाही. त्या वेळेस त्यांनी सांगितले की रिक्त असलेली पदे ओपन भरुन टाकावे व मंजूरीस्तव शासनाकडे पाठवावे शासन ५० टक्के अनुदान देण्यास तयार आहे.

मा. आयुक्त : ठिक आहे. आपल्या शासनाकडे प्रस्ताव आहे. शासन आपल्याला लेखी काही देत नाही. की, तुम्ही आम्हाला गरज नाही आहे.

श्री. मोतीराम घडामोडे : आपण शासनाकडे लेखी पाठवावे की, आम्ही शिक्षकांचे रिक्त पदे भरीत आहोत व अनुदान देण्याबाबत कळवावे.

मा. आयुक्त : प्रस्ताव पाठविल्यानंतर शासनाचे उत्तर येइरल. मी एवढेच करू शकतो की, त्यांना एक्स्पीडाईट करून देतो की, अस अस आहे. आणि मग आम्हाला गरज आहे की, नाही आपली परवानगी जिथे म्हणत असतील गरज नाही तर आपण भरता येईल.

श्री. अजिजूल्ला बेग : डि.पी.डी.सी. ने ३० पदे शिक्षकांचे सन १९८९ मध्ये मंजूरी दिली त्या बाबत काय?

मा.महापौर : त्रिपाठी साहेबांशी या बाबत चर्चा झालेली आहे. मुंबईला या संदर्भात जाऊन चर्चा करुन करता येईल.

**ठराव क्र. ५५/२३ :** सदरील प्रस्ताव शासनाकडे मंजूरीस्तव पाठविला असल्याने शासनाकडे पाठपूरावा करणे आवश्यक आहे.असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ५६/२४ :-** चिस्तिाया कॉलनी झोपडपट्टी वासियांना शासनाची कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्याने चिस्तिया कॉलनी भागातील अल्पसंख्यांकी नागरीकांचे बुरे हाल होत आहेत. त्यांचे राहण्याचे मकान व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्या करीता मागासवर्गी/ भटक्या जाती/जमातीचे लोकांना शासनांची सुविधा जास्ती जास्त देण्या करीता सदरील भागास स्लम जाहिर करण्यात यावा.

पश्चिमेस रोड - पुर्व रस्ता
उत्तरेस - एन-६ (कॉलनी ) दक्षिणेस - रस्ता

सुचक - श्री. मोहसिन अहमद
अनुमोदक - श्री. अलफखॉन हूसेनखॉन
दिनांक - १५/१०/९१

**संवाद :**

श्री. मोहसिन अहमद : संबंधीत प्रस्ताव नुसार स्लम घोषीत करावे कारण चिस्तीया कॉलणी म्हणून गेल्या दहा ते बारा वर्षापासूनची अस्तिवात आहे. आणि ४००-५०० घराची वस्ती असून मनपाने टॅक्स वसूल केलेला आहे. जवळपास लाख दिडलाख टॅक्स भरलेले नागरीक आहेत. परंतू त्या ठिकाणी मनपाच्या कोणत्या ही नागरीसुविधा उपलब्ध अध्यापही झालेल्या नाहीत, त्या ठिकाणी पाणी, ड्रेनेज लाईन रस्ते आदि सुविधा दिल्या गेलेल्या नाहीत येथील वस्ती गरिब व भटक्या लोकांची असून स्लम घोषीतहोण्यासाठी कार्यवाही व्हावी.

श्री. विठ्ठल पेरकर, श्री. केशव सोनवणे : सदरची जागा खाजगी नसून सिडकोची आहे. आणि सिडकोने एचएमटी कंपनीला दिलेली परंतु तेथे लोकानी अतिक्रमण करून घरे बांधलेली आहेत व काहींना टॅक्स लावलेला आहे. ते योग्य नसून स्लम घोषीत करणेचे गैर आहे. कारण झोपडपट्टीच्या सुविधा उपलब्ध करणे ठिक नाही.

मा. आयुक्त : टॅक्स कधी लावलेले आहे. टॅक्स आणि रेगूलाईज करण्याचा संबंध नाही येत.

श्री. केशव सोनवणे : संबंधित नागरिकांना मा. आयुक्तांनी अतिक्रमण केलेल्या जागेवर टॅक्स लागून चुक केली म्हणून आपण पुन्हा, झोपडपट्ट्यांना सुविधा मिळण्यासाठी स्लम घोषित करायचे का ?

श्री. स. हूसैन स. अहमद : स.सदस्य श्री. मोहसिन अहमद यांनी सुचित केल्या प्रमाणे योग्य असून तेथील नागरिक सर्व गरीब असून त्यांना सुविधा उपलब्ध करून द्यावे. यासाठी स्लम घोषित करणे आवश्यक आहे. मागेही बागशेरजंग या भागात पी.आर.कार्ड एकाच्या नावाने परंतु लोकांनी कुणाच्याही नावाने धंदे केलेले आहेत व ड्रेनेज लाईन टाकलेले आहेत. त्या बाबत आम्ही काहीही

बोललेलो नाही परंतू आपण सर्व स. सदस्य निवडून आलेलो आहोत.ते गरीबांचे कामे करण्यासाठी त्यांना सुविधा उपलब्ध करुण देण्यासाठी.

श्री. रशिद मामू : या संदर्भात बऱ्याचशा झोपडपट्या ज्या आहेत त्यांना स्लम घोषित केलेल्या आहेत. आता ती जागा जर एचएमटी कंपनीची असेल तर तुम्ही सांगा परंतु त्या वॉर्डाचे नगरसेवक श्री. घडामोडे यांचेही मत काय आहे. ते समजून घ्यावे.

मा. आयुक्त : नियम के मुताबीक घोषीत कर सकते है तो करेंगें अगर नही करते है तो नही करेंगे.

श्री. जयवंत ओक : माझा वार्ड नारळीबाग आहे. तेथील वस्ती जवळपास २०वर्षापासून अस्तिवात आलेली आहे. शहरामध्ये अशा अनेक वस्त्या झालेल्या आहेत की, त्या अनधिकृत आहेत. मग आपण त्या सर्व वस्त्यांना स्लम घोषित करणार काय? माझ्या वॉर्डास आपण स्लम घोषीत करणार काय? आणि सर्व सुविधा उपलब्ध होणार काय यांचे माहिती द्यावी.

श्री. मोहसिन अहमद : माझा इतर वॉर्डासी काही विरोध नाही मी केवळ या वार्डासाठी व प्रस्तावावर बोलत आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : स. सदस्य. श्री. स.हूसेन स.अहमद यांनी म्हटले की, बागशेरजंग भागामध्ये लाखो रुपये कमविले. मला हे सांगा कोणता भाग एज्युकेशन झोन मध्ये येते, आणि कोणता भाग येत नाही. बागशेरजंग भागातील जवाहर कॉलनी, त्रीमुर्तीचौक, बालाजी नगर वगैरे जो भाग आहे. तेथून अजुनही ड्रेनेज लाईन गेलेली नाही आणि त्यासाठी स. सदस्य श्री. प्रदिप दत्त सारखा भांडत आहे. तेव्हा या बाबत गैरसमज मनातून काढून टाकावे.

श्री. अजिजूल्ला बेग : शहरामध्ये एकून ६८ झोपडपट्ट्या आहेत पैकी ६० घोषीत आहेत. बाकीचे वस्त्या अनाधिकृत आहेत की नाही. जागा कुणाची आहे ते मी सांगू शकत नाही. व शासनही घरे बांधलेली पाडू शकत नाहीत. तेव्हा मला एकच म्हणायच आहे कीर,म्युनिसिपल कार्पोरेशन ॲक्ट १९७१ प्रमाणे मा. आयुक्तांना अधिकार आहे की, कोणता भाग स्लम घोषीत करावयाचा नियम ४ प्रमाणे ते करता येवू शकते व तसे करण्यास हरकत नाही.

मा. आयुक्त :- मै इसिलिये देख लेता हू मुझे एक्झामिन करणे दिजिये अधिकार मुझे है नियम मे अगर है तो जरुर करुंगा अगर नही होगा तो नही करुंगा.

श्री. चंद्रकांत खैरे :- मी एक उपसुचना देत आहे. माझ्या माहितीप्रमाणे सदरील जागा सिडकोची असून एचएमटी ला जागा दिलेली आहे .

मा. आयुक्त :- पहिले एक्झामिन कर लेंगे वो अगर लिगली है तो देखेंगे वो मेरा अधिकार है. पहिले आप ठरावपास करके क्या करेंगे

मा. महापौर, :- ठिक आह मा. आयुक्त या संदर्भात प्रत्यक्ष पाहणी करुन नियमाप्रमाणे पुढील बैठकीत माहिती ठेवण्यात येईल. हा अधिकार मा. आयुक्तांचा आहे.

श्री. मोहसीन अहेमद : ठिक आहे मा. आयुक्तांनी पाहणी करावे त्यास आमची काही हरकत नाही परंतु अगोदर प्रस्ताव करू घ्यावा.

श्री. स. हूसेन अहमद. श्री. अलफखॉन :- प्रस्ताव मंजूर करावा ज्यांना विरोध नोंदवावयाचा असेल त्यांनी नोंदवावा तेथील भागामध्ये ४०० लोंकाची वस्ती आहे. त्या ठिकाणी पिण्याचे पाण्याची व्यवस्था नाही. मी पत्राद्वारे वेळोवेळी केलेले आहे. तेथे एक विहीर आहे ती साप करुन घ्यावी परंतू अद्यापही केलेली नाही.

याचे कारण काय? पिण्याचे पाणी का दिल्या जात नाही टँकर पाठविला जात नाही.

श्री. अजिजूल्ला बेग :- माणुसकी ह्या नात्याने आपण मनपाचे कर्तव्य आहे की, संबंधीत विभागात पाणी पुरवठा करावे.

मा. महापौर :- ठिक आहे. माणुसकी या नात्याने आपण संबधीत भागास पाणी पुरवठा करणे बाबत सुचविता येईल परंतू नियमाप्रमाणे काय होईल ते पाहणी करुन करता येईल.

श्री. चंद्रकांत खैरे : सन १९८८ पासून स.स.श्री. प्रदिप दत्त व अविनाश कुमावत बोलतात की, बागशेरजंग येथील भाग स्लम घोषीत करावे मग आपण करणार काय?

मा. महापौर : आता सांगितल्या प्रमाणे मा. आयुक्त पाहणी करतील व नियमाप्रमाणे योग्य आहे काय ते ठरवून कार्यवाही करतील.

**ठराव क्र. ५६/२४ :** सदस्य प्रस्ताव पाहणीनंतर पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.५७/२५ :** प्रतिवर्षी महानगरपालीका कर्मचाऱ्यांना दिपावली निमीत्त बोनस वाटप करण्यात येतो. वाढती महागाई जिवनावश्यक वस्तूंचे वाढते भाव लक्षात घेता मनपा कर्मचाऱ्यांना यावर्षी ४५ दिवसाचा बोनस व ज्या कर्मचाऱ्यांना अधिकाऱ्यांना बोनस पासून वंचित रहावे लागते अशा कर्मचाऱ्यांना अधिकाऱ्यांना रुपये १०००/- बक्षीस स्वरुपात मंजूर करावे.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | श्री रतनकुमार पंडागळे |
| अनुमोदक | - | श्री. अलफखान हूसेनखान |
| | | श्री किशोर थोरात |
| | | श्री. गजानन बारवाल |
| | | श्री. ॲड. एकबालसिंग गिल |
| दिनांक | - | १६/१०/९१ |

**संवाद**

श्री. प्रदिप जैस्वाल : एकतर अंदाजपत्रकीय तरतूद करतांना या प्रस्तावा बाबत विचार व्हावा आणि अंदाजपत्रकात तशी तरतूद केलेली असून हा प्रशासकीय बाब असल्याने या सभाग्रहाने यात हस्तक्षेप करु नये.

श्री. अजिज जहागिरदार : मागील वर्षी शासनाने २७ दिवसाचा बोनस जाहीर केलेला होता. व या मनपाने ३२ दिवासाचा बोनस दिला आणि या वर्षी शासनाने व इतर मनपाने २९ दिवसाचा बोनस जाहीर केलेला आहे. तेव्हा मागील वर्षी चुकी केल्याने यावर्षी तरी २९ दिवसाचाच बोनस जाहिर करावयास पाहीजे होता परंतू ३२ दिवसाचा बोनस जाहिर केल्याने आता ४५ दिवासाचा बोनस देवून मनपाने आर्थिक बोजा लादु नये असे मला वाटते.

श्री. केशव सोनवणे : आपण जो ३२ दिवासाचा बोनस देवू केलेला आहे. तो जास्तीचाच आहे. व्यवस्थापनावर ४५% पैसा खर्च करतो त्यामुळे विकास कामे करण्यास अडथळे येतात यासाठी ३२ दिवसाचाच बोनस देण्यात यावा आणि हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

श्री. मोहम्मद ईस्माईल :- स.स.श्री. अजिज जहागिरदार यांनी सुचविल्याप्रमाणे मागील वर्षीच ३२ दिवासाचा बोनस देवून चुक केली आहे. ते खरे आहे. आता

प्रशासनाने या वर्षी ३२ दिवसाचे बोनस जाहीर केलेला आहे. तर हरकत नाही मनपाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता ३२ दिवसाचा दिलेला बोनस योग्य असून त्यात कोणतीही वाढ करण्यात येवू नये.

मा. चंद्रकांत खैरे : मा. आयुक्तांनी ३२ दिवासची बोनस जाहिर केलेला आहे. तो कायम ठेवावा व प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

मा. महापौर : बोनसच्या प्रश्नावंर संदर्भात सभागृहाने निर्णय घ्यावयाचा असतो तो सभागृहाला अधिकार आहे आणि मा. आयुक्तांनी ६७ (३)(क) चा वापर करुन ३२ दिवासाचा बोनस कर्मचाऱ्यांना देवू केलेला आहे. आणि तो आपल्यांला कळविला आहे. आता यावर आपल्याला काही सुचवायचे आहे तर सुचवा पंरतु हा निर्णय सभागृहालाच आहे.

श्री. रशिदखान (मामू) : मा. महापौर मा. आयुक्तांनी ३२ दिवसाचा बोनस जाहिर केला यामध्ये असे करता येत नाही काय की, ३० दिवसाचा बोनस व २ दिवसाचा आयुक्ताकडून ईनाम अशा प्रकारचा ३२ दिवसाचा समजण्यात यावा. सदरील प्रस्ताव प्रशासनातर्फे यावयास पाहीजे होता स.स.नी प्रस्ताव ठेवल्याने उगाचच चर्चा होत आहे.

श्री. रतनकुमार पंडागळे : स.स. श्री अजीज जहागिरदार यांनी म्हटले आहे.की, मनपाला मागील वर्षी शासनाने २७ दिवसाचा बोनस दिलेला आहे. मनपाने ३२ दिवसाचा दिला तेव्हा मी सांगू इच्छितो की, त्यावेळी या ठिकाणी प्रशासक होते त्यावेळी शासनाने १५ दिवसाचा बोनस जाहिर करुन ही मनपाने १८ दिवसाचा बोनस पदरी टाकून घेतलेला होता. म्हणजे ज्या ही वेळेस शासन बोनस जाहिर करील त्यापेक्षा ३ दिवसाचा बोनस अधिक कर्मच्याऱ्यांना देवू केलेला आहे. दुसरी गोष्ट अशी की, आम्ही ज्यावेळेस हा प्रस्ताव सभेमध्ये ठेवला त्यावेळेस मा. आयुक्तांनी बोनस जाहिर केलेला नव्हता. त्यामुळे हा प्रश्न सभाग्रहाच्या चर्चेसाठी व मंजूरीसाठी ४५ दिवासाचा बोनस मिळावा म्हणून ठेवलेला आहे. आणि नंतर प्रशासनाने ३२ दिवसांचा बोनस जाहिर केला तेव्हा आम्ही त्यापेक्षा जास्त बोनस मागणीसाठी प्रशासनाकडे केली त्यांनी सांगितले आता आम्ही जाहीर केलेला आहे. आता बदल होणे शक्य नाही मग आम्ही या मागणीसाठी सभागृहाकडे करणार नाही तर कुनाकडे करणार आम्हाला माहिती आहे . मनपाची आर्थीक परिस्थिती नाजूक आहे. तरी ही ४५ दिवसाचा बोनस ऐवजी ३२ दिवसाचा दिलेला आहे. पंरतू सभागृहाने निर्णय यावर घेणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे ज्या कर्मचारी अधिकाऱ्यांना रुपये २५००/- पेक्षा जास्त पगार मिळतो त्यांना बोनस मधून वंचीत रहावे लागते अशा कर्मचाऱ्यांना रुपये १०००/- बक्षीस म्हणून सहानुभूती पुर्वक विचार करुन निर्णय घ्याल अशी अपेक्षा.

श्री. प्रदिप जैस्वाल : माझे वैयक्तिक मत आहे की, सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा आणि कर्मचारी सकाळी कामावर येत नसतील तर माझी विनंती आहे सर्व स.स. ५=०० वाजता आप आपल्या झोनवर जमून स्वेच्छेणे काम करुन टाकावे.

मोतीराम घडामोडे : काही कर्मचारी संपावर जाण्यासाठी तयारी करीत आहेत. तेव्हा सहानुभूतीने विचार करुन त्यांना जो २५० रु. वेतन अगावू उचल दिलेली आहे. ती जरी माफ केली तरी चालेल अशा प्रकारची भूमीका आहे. तेव्हा

विनाकारण प्रशासनाने ताठर भूमिका घेवूनये व साफसाफाई शहरात चांगली व्हावी, घाणीपासून वाचवावे या बद्दल विचार करावा.

मा. महापौर :- मा. आयुक्त खुलासा करतील.

मा. आयुक्त :- स. महापौर, उपमहापौर, आणि स.स.हा विषय फार महत्वाचा आहे. म्हणून थोडस उभे राहून बोलल तर आपल्याला परवानगीने आपण सहालाख लोंकाचे प्रतिनिधी आहात आणि पुर्ण विचार करुन जेव्हा या कार्पोरेशनचे बजेट मंजूर केले तर ४१ लाख रुपयेची आपण तरतूद केलेली आहे. या कार्पोरेशनचा एम्पालाईज जेव्हा जेव्हा पगार किंवा स्केल मागतात. तर जसा शासनाचा स्केल वाढतो शासनाचा डि.ए. वाढतो ते डि.ए. डी. ए. चे नार्मस असतात त्या प्रमाणे ते नॉर्मस असतात. त्या प्रमाणे ते पैसे मागतात. प्रत्येक गोष्टी मध्ये चौथा आयोगआला पगार वाढवून दयायचा. त्यांनी मागणी केली. त्या प्रमाणे आपण दिले. म्हणून शासनाने जे मापदंड ठेवलेले आहेत जे पेस्केल ठेवलेले आहेत ते पुर्णपणे आपण फॉलो करतो. मग शासनोने जेव्हा २९ दिवसाचा बोनस जाहीर केलेला आहे तर आपण त्याच्या प्रमाणे नियम फॉलो करायला पाहिजे . अशी आमची भूमिका आहे. पण मागच्या वर्षी ३२ दिवसाचा जाहिर केलेला होता. आणि ४१ लाखामध्ये पुर्णपणे ४० लाख आणि ३० हजार आपण ३२ दिवसाच्या बोनसमध्ये पैसे पडतात म्हणून आपण अशा डिसिजन घेतला की मागच्या वर्षी पेक्षा आपण २९ दिवसाचा जाहीर केला तर एक प्रकारचा अन्याय होईल अशा प्रकारची भूमिका येईल इव्हन दो माझे व्यक्तीगत मत आहे. आपण जे सर्व गोष्टीमध्ये शासनाचे फॉलो करतो तर २९ दिवसाचे ते पण फॉलो करायला पाहीजे. आपले माहितीसठी मी आज सोलापुरला फोन केला तिथला मला आयुक्ताने सांगितले की त्यांनी २९ दिवसाचा बोनस दिला आहे. पिंप्री चिंचवड जी महापालिका राज्यात किंवा देशात सर्वात मोठी रिच कार्पोरेशन आहे त्यांनी परहेड कॅल्क्युलेट केल. त्यांनी ८.३३ म्हणजे ३० दिवसाचा जो पगार आहे त्या प्रमाणे जाहीर केलं. आपली जेव्हा कुवतच नाही आपली एके चाळीस लाख रुपयाची बजेट आहे. ती पुर्ण पणे आपण ह्या स्वरुपात दिलेली आहे. कार्पोरेशनने ती मान्य केल्यांनतर बजेटमध्ये ६७ (३)(ब) मध्ये आयुक्तांना अधिकार आहे ती ते त्यांच्यामध्ये मान्य करु शकतील आपली मिटींग एनवेळी आणता येत नाही. म्हणून येथे डिसाईड करता येत नाही. इन ऐनी केस जी.बी ने हा विषयपूर्ण ४१ लाख रुपये मंजूर करून दिलेला होता. त्यांचे जर व जायचे असते ४१ लाखाच्यावर जर मला ६७ (३)(ब) लावल्यानंतर मग जी. बी. कडे येण्यासाठी कायदेशीर पध्दत आहे. कारण बजेट आपण एक्सपेंड करतो पण आज परिस्थिती आणि आज कार्पोरेशनची आर्थिक परिस्थिती बधून मला असे झाले की, जर आपण एक दिवसाचा आणखीन बोनस दयायचे जर असेल तर कार्पोरेशन वरती दर दिवसाला एक लाख आठ्ठाविस हजार रुपये खर्च येतो. आणि एक दिवस जर आपण एक्स्ट्रा जाहिर केला तर जी २५० ची मागणी आहे किंवा १०० ची मागणी वगैरे आहे तर आज आपल्याला विकासाचा पैसा काढून लोकांना बोनस दयावा लागेल आपण सहा लाख लोकांवरती अन्याय करणार नाही. १५००लोंकांच्या भल्यासाठी सहालाख लोकांचा अन्याय मला मान्य नाही. आणि म्हणून आम्ही हा डिसीजन घेतला की जे कार्पोरेशननी

घेतलेले आहे. त्यातच अंमलबजावणी करायची आज सकाळी ५=३० वाजता आम्ही सगळेजण माझे बरोबर डि.एम.सी होते आणि संगळेजन आपण गेलो मला असे दिसले की, बहूतांशी कर्मचारी ३२ दिवसामध्ये समाधान आहेत. फक्त १०% सोशिअल अलीमेंट बाहेरचे लोक आणि जे गूंड प्रवृतीचे लोक आहेत. ते त्यांना धमकून माझ्या समोर आलेली गोष्ट आहेत आता अनफॉरचिनिटली मी पोलीस आयुक्तांशी बोलनी केली त्यांनी मला पोलीस मदत दिली आज पाठविली पण मदत आणि इंटलिजंट त्याचा दुसरा पण विचार होता. इंटलिजन रिपोर्टप्रमाणे पण फोर्सेस आल्यानंतर हे सर्व आपण प्रोटेक्ट करुन दिल पण हे लोक जेव्हा माझ्या समोर धमकी देतात मी स्विपर बाई आहे त्यांच्याशी मी चर्चा केली त्यांनी मला सांगीतले की साहेब मला घरी येवून धमक्या देतात तर आम्ही त्याना सांगितल अस होणार नाही आणि त्याच्यावरती काही करीत असतील तर आपण त्यांच्यावरती पोलीस ॲक्शन घेवू अशा प्रकारची घटना आहे. जर आव्हान केले तर कुणीही संपावर जाणार नाही फक्त १०% लोक आहेत जे अंटीस्रोसिअल इंलेटमेंट लोक आहे. सर्वांना अशा प्रकारच्या धोका करतात आणि मिसलेड करतात या लोंकाना यातील भूमिका आहेत. आणि आम्ही असा डिसीजन घेतलेला आहे की, आपली सर्वांच्या सहमतीने की, आपण डिसीजन घेतलेला होता. की, जर ३२ दिवसाच्या बोनस मान्य असेल तर त्यालाच कायम राहू आणि थोडस माझ्या रेकॉर्ड प्रमाणे वर्ग-३ आणि वर्ग-४ मध्ये २८८१ लोक आहेत. त्यातले फक्त ४१४ लोक संपावरती होते शनिवारच्या दिवसीरविवारला सुट्टी असते म्हणजे फक्त १४% रेकॉर्ड वरती आहे. आणि हे सर्व दमदाटी करुन लोक आणलेले आहे . तर आपली सहमती असेल तर मला जर सहकार्य असेल तर आपण पाहून हा संप कशाही मीटवावयाचे आहे. आणि कोणताही आपण आयडोंट थिंक आपण प्रेशरमध्ये येवून हे केले पाहीजे कारण आपण अशा प्रकारचा कोणताही डिसीजन घेतला तर आपल्याला सहालाख लोक माफ करणार नाही. कारण आपण त्यांच्या विकासाचा पैसा काढून आपण त्यांना देणार आहोत आणि ३२ दिवसशासनाने दिलेले बोनस पेक्षा तीन दिवसजास्त आहे. कोणत्याही प्रकारच्या अन्याय नाही म्हणून माझी विनंती आहे की, सर्व ६० कार्पोरेटर्सना की , आप-आपले वॉर्डामध्ये तुम्ही आलेत मी आहे. तिथे सकाळी ५=३० वाजता आणि अशा प्रकाच्या दमदाटी देतात. त्यांना जर हाकलून दिले तर कोणत्याही प्रकारचे हे येणार नाही एवढे मी सर्वांचे सहकार्याने अपेक्षा करतो.

श्री. अजिज जहागिरदार : मा. आयुक्तांनी सुचीत केल्याप्रमाणे सर्व स.स.नी. आपल्या वॉर्डामध्ये येवून सकाळी ५=३०वाजता सहकार्य करावे व आयुक्तांना मदत करावे.

श्री. रतनकुमार पंडागळे : मा. आयुक्तांनी जी माहिती दिली ती योग्य आहे. परंतू २५००/- च्या वरिल कर्मचाऱ्यांना बोनस मिळत नाही . त्याबाबत विचार कराल तर बर होईल माझ्या माहितीप्रमाणे शासनाचा असा निर्णय झालेला आहे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे कर्मचारी मनपामध्ये येऊन गुंडागिरी करतात त्यांच्यावर आपण कार्यवाही करणार आहात काय ?

मा. आयुक्त :- शासनाच्या निर्णयानूसार रुपये २५००/- च्या वरिल पगार असलेल्यांना बोनस दिल्या जात नाही. आणि रुपये ४१ लाखाच्या वरती जर दयायचे झाल्यास

तरतूद केल्यानुसार पुन्हा आपल्याला जी.बी.पूढे जावे लागेल. आणि सहा लाख लोकांचा विकासाचा पैसा आपल्याला डिवरेट करावा लागेल आणि मनपामध्ये जे कर्मचारी गुंडगिरी करतात त्यांच्यावर कार्यवाही केली जाईल.

मा. महापौर : ठिक आहे प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

"जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

.